म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५३८
सं.न.१९२६
सं. काव्य ८४2
REFBK-0003145
REFBK-0003145

# तारका



...रा—
...मण्डळ

१८२६

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. .........
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय,
संकलन नं. ......
ठाणे.

3784

यद्यस्ति काव्यं राज्येन किम् ।

—सुभाषितम्.

# विलोल--तारका

अजिंक्य-तारा-मंडळ, सातारा.

REFBK-0003145
REFBK-0003145

१९२६ ]

[ किं. ८६ आणे.

प्रकाशकः— शांताराम गोपाळ गुप्ते
चिटणीस, अजिंक्य—तारा—मंडळ,
सातारा.

## नियामक मंडळ.

श्री. वाग्भट नारायण देशपांडे बी. ए., एल्. एल्. बी.
प्रो. विष्णु नारायण कुंभारे एम्. ए.
श्री. गोविंद सदाशिव आठल्ये, वकील.
श्री. पंढरीनाथ वामन घाणेकर

मुद्रकः— हरी गणेश कोल्हटकर,
महाराष्ट्रमित्र छापखाना,
७७ शुक्रवार पेठ, सातारा

# परिचय—

गेल्या दिवाळींत येथें स्थापन झालेल्या "अजिंक्य-तारा-मंडळा" चें हें पहिलें पुस्तक प्रसिद्ध होण्याचा सुयोग ईश्वर कृपेनें आज येत आहे. अशा पुस्तकाला प्रस्तावनेची खरोखरीच जरूर नाहीं; तथापि काव्यसेवेसाठीं 'आजिंक्य-तारा-मंडळा' सारखें कविमंडळ सातार्‍यासारख्या शहरांत स्थापणें हें पहिलें धाडस करून, आपलीं काव्यसुमनें रसिकांच्या आदरार्थ वाचकांच्यापुढें प्रथमच ठेवण्याचें दुसरें धाडस करणार्‍या कवींना परिचयाची आवश्यकता भासणें साहजिक आहे. या पुस्तकांतील कवितांच्या गुणदोषांचें विवेचन करणें हें अर्थात्च रसिकांचें काम आहे; पण त्यांच्या टीकेच्या दहीला सदयतेचा ओलावा यावा म्हणून हें मात्र सांगणें जरूर आहे कीं या पुस्तकांतील बहुतेक कवी–अर्थात्च कांहीं थोडे अपवाद वजा करून–वाङ्मयांत पहिल्यांदाच प्रवेश करीत आहेत. ही गोष्ट लक्षांत घेतां, आणि पुढील कवींपैकीं बहुतेक सुद्धां सातारचेच आहेत हें पाहतां, या शहराच्या दुर्दैवाचा परिणाम त्यांच्या बौद्धिक संपत्तीवर झाला नाहीं हें पाहून वाचकांना समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. मराठी वाङ्मयाची सेवा करण्याचें पवित्र कार्य साताराहि आपल्या शक्तीप्रमाणें करीत आहे एवढें महाराष्ट्राच्या लक्षांत येण्याइतका जरी या पुस्तकाचा उपयोग झाला तरी "अजिंक्य-तारा-मंडळा" स तो आपल्या कार्याचा शुभशकूनच होईल.

सातारा
१५ मार्च १९२६ } वाग्भट नारायण देशपांडे.

# शामानुज.

## विलोल-तारका !

[ चालः—कृष्णाकाठीं कुंडल. ]

नवल सांगतों, ऐका रसिका, दिशा कशानें घुमल्या ? ।
डोंगरमाथ्यावरल्या तारा गाउं लागल्या सगळ्या ! ॥
रानकवींची लकेर उठली अजिंक्यताऱ्यावरती ।
स्वयंस्फूर्तितेजानें बनली विलोल तारापंक्ति ॥
दिव्यज्योतीं थरारती नभिं अनंत तारादीप ।
त्यांच्या तेजानें पाजळले कविचे काव्यप्रदीप ॥
पुण्यतत्वतेजाचीं खुललीं तारांचीं भांडारें ।
इंद्रपुरीचीं नवरत्नांचीं झळकतिं प्रवेशद्वारें ॥
खचुनी भरला जिकडेतिकडे अगदीं घनांधकार ।
चल तर रसिका जाउनि लुटुं तें तेजाचें भांडार ॥
डोंगरमाथ्यावरची विलोलतारांची फुलझाडी ।
लाविल रसिका साहित्याच्या रंगरसाची गोडी ॥
बघा ढगांची श्यामल सुंदर सजवोनी रथगाडी ।
फिरते तारा राणी अंबरिं तिचीच वस्तीवाडी ॥

संकीर्ण 842
4388
3784

वीररसानें कुणि स्फुरणारी त्यांतिल ताराबाला ।
वाटावी समशेर रणामाधिं जणुं लखलखती चपळा ॥
कुणी तारका घेउनि हातीं नक्षत्राचा बाण ।
नामर्दांना स्फुरवुनि शिकवी शौर्याचें अवसान ॥
कुणी चांदणी गुंफित बसली ढाळुनिया हिमवंती ।
वात्सल्याच्या सुवर्णसूत्रीं अश्रूंचें मणिमोतीं ॥
कुणी चांदणी अस्मानाच्या रंगित महालमाडीं ।
चंचळ डोळे मोडित बसली ती प्रेमाची वेडी ॥
कुणी चांदणी लाजत मुरडत भिडली चंद्रानिकटीं ।
बघाच, रसिका, साजे सुंदर लालडिला तो मोती ॥
झिम्माफुगडी खेळत आल्या दोन चांदण्या रंगा ।
हास्यविनोदाचाहि घातला अस्मनाभर पिंगा ॥
एका मागुन एक अशा या चतुर चांदण्या जमल्या ।
मनास रुचलीं तसलीं गाणीं गाउं लागल्या सगळ्या ॥
गाण्यांतुनि या कारुण्याचा कां हा साक्षात्कार ? ।
कोण्या तारेच्या तंत्रीची तुटली सुवर्णतार ! ॥
अशीं रंगलीं नभोमंडळीं विविधरसांचीं गाणीं ।
त्यांतिल अमृत प्याला ह्मणुनी कविची अमृतवाणी ॥
चंद्राभंवती तारांचें मृदुमंजुळ गाणें घुमलें ।

त्या नादानें चंद्रावरती हारिणहि धांवत आलें! ॥
त्या गाण्यामधिं गुंगुनि गेला समरस कविगण सारा ।
गातां गातां बनली त्याची ही एक एक तारा ! ॥
तारा गीतांची ही गंगा उचंबळोनी आली ।
तिच्या, शारदे, अभिषेकाची धार तुझ्यावर धरली ॥

* * *

वाहुनि गेली तरीहि गंगा जसें राहतें तीर्थ ।
तसेंच गाणें विरलें जरि हें उरेल त्याचा अर्थ ! ॥

## दरियास—

व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतु- ।
र्न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते ॥ –**भवभूति.**

[ चालः—वाजिवरे बाळा. ]

दरिया सांग मला । कां असला । तुजला जडला चाळा ॥ध्रु॥

* * *

रात्रीच्या काळीं । कुणि हंसली । बाला क्षितिजावरुनी ॥
रतिमूर्ती साची । तेजाची । सौंदर्याची खाणी ॥
सकल कला लेणीं । लेवोनी । सजली सज्जावरती ॥

हंसऱ्या मेघांचा । लज्जेचा । दूर सारिला शेला ॥
सोडुनि सर्व सुधा । मधुशुद्धा । बुडवी सगळी वसुधा ॥
प्रीतीची गंगा । स्वर्गंगा । पसरवि निजरसरंगा ॥
भालीं रत्नांची । तारांची । जाळी मोतियांची ॥
मृदुमधु विनयानीं । अस्मानी । शाल नभ पांघरुनी ॥
सुंदर नक्षत्रीं । शालुवरी । साजे खडि जरतारी ॥
सुंदर स्वर्गाचा । गालीचा । निळ्याच मखमालीचा ॥
प्रेमळ चालीचा । डौल तिचा । चंदेरी दौलतिचा ॥
अशि दिसली रजनीं । नभांगणीं । चमकत चंदाराणी ॥
ती नउनवसाची । दरियाची । प्रीतिदेवता साची ॥
सगळ्या स्वर्गाची । प्रीतीची । ज्योत पेटली पुरती ॥
अनंत अंतरिची । दरियाची । हंसली हिरवी दुनिया ॥
रत्नाकर-नेत्रीं । चंदेरी । सुरत साजिरी भरली ॥
गहिरी नजरेचा । प्रीतीचा । घाव जिव्हारीं बसला ॥
बाला देखुनियां । तो दरिया । विकारविलसित झाला ॥
तेव्हां खळबळलें । तळमळलें । दरियांतिल जळ सगळें ॥
तेजस्वी बाला । ती त्याला । दिसली किति दिवसांनीं ॥
म्हणुनी उल्हासें । तो हांसे । किती भराभर उसळे ॥
भरली तच्चित्तीं । त्या रातीं । सुरतरसाची भरती ॥

प्रति रोमांमधुनी । थरथरुनी । उसळति नवथर लहरी ॥
हळुहळु कुजबुजती । निजचित्तीं । प्रीतीच्या गुजगोष्टी ॥
मानस महिरोनी । बहरोनी । शुद्धबुद्धही हरुनी ॥
" दिव्य स्वरुपाची । रजनीची । निळ्या नभाची राणी ॥
" व्हावी याच क्षणीं । मम रमणी " । सागर चिंती स्वमनीं ॥
मग तो चुंबाया । बिंबा त्या । विलंब न करी क्षणही ॥
दरिया सांग मला । हा कसला । तुजला जडला चाळा ? ॥
उडत्या लहरींच्या । कोमलश्या । निजहस्तांसी पसरी ॥
पिंजुनि लहरींसी । गगनासी । जाल जलाचें फेंकी ॥
प्रेमें भेटाया । उंच तया । भिडसी अस्मानासी ॥
परि तूं एखादी । त्या आधीं । फुटकी नौका गिळिसी ॥
उलथुनि पडलासी । फसलासी । ह्मणुनी तारा हंसती ॥
तत्क्षणिं पेटवुनी । हट्टानीं । वडवानल मग स्वमनीं ॥
रागारागानें । वेगानें । उंच उंच तूं उडसी ॥
हा हा ! तेथुनही । लवलाही । पुन्हां पुन्हां आदळसी ॥
ह्मणुनी उपहासें । वरि हांसे । निळ्या नभाचा दरिया ॥
तरि करि परतोनी । तूं उठुनी । थिल्लर थैमानासी ॥
लहरीवरि बसुनी । उह्लाणी । दुसरी स्वारी करिसी ॥
अंध प्रेमाची । प्रीतीची । शर्यत मोठी करिसी ॥

पिंजुनि पडति जळा । रसातळा । परतुनि पाताळासी ॥
फिरत्या भंवऱ्याच्या । मोहाच्या । प्रेमरंगणीं भ्रमसी ॥
प्रेमें अर्पाया । तिजला त्या । तरंगमाला गुंफी ॥
अंतीं आदळुनी । खवदळुनी । फेंस उसासे फेंकी ॥
तुझिया हृदयाचें । प्रीतीचें । झालें पाणी पाणी ! ॥
व्यर्थचि पृथ्वीचा । स्वर्गाचा । दुवा सांधण्या बघसी ॥
अरुसी तूं कोठें । ती कोठें । सोड वेड तें खोटें ॥
बनलासी योगी । हटयोगी । पुरा प्रीतिचा रोगी ॥
बाला मावळली । या वेळीं । प्रीतिज्योत निमाली ॥
हर हर ! दरियाचा । प्रीतीचा । हार राहिला अपुरा ॥
तेथुनि दिनरजनीं । क्षणोक्षणीं । मरूं लागला स्वमनीं ॥
प्रेमळ दरियाच्या । मृदुहृदया । कसला चटका बसवी ? ॥
या विरहायोगें । त्या लागे । ओहटिची ती झुरणी ! ॥

*   *   *

कुणि कितिही निंदा । कुणि वंदा । प्रेमाचा जिव बंदा ॥
प्रेमाविण जगणें । व्यर्थ जिणें । मरणाविण तें मरणें ! ॥

## विषारी !

[ ईश्वरानें कांहीं कांहीं अति सुंदर वस्तु निर्माण केल्या परंतु त्यांतहि त्यानें विष घालून ठेविलें तें कां बरें ? ]

ज्या हेतूनें अखिल विश्व हें देवा त्वां निर्मिलें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
तुझ्याच श्वासांतुनि हें वारें पृथ्वीवरती सुटलें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
सहज निर्मिलीं रम्य सुगंधीं रंगित सुंदर फुलें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
खुलति कांतिनें तेजस्वीं रसराशित गोमटीं फळें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
खलहृदयांच्या जिव्हाग्रावरि अमृत ओथंबलें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
विशाल सुंदर फणा काढुनी चंदनवनिं फणि डुले ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
ज्या भूगर्भीं कांचन, माणिक, दीप हिऱ्यांचे लागले ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ? ॥
उपमन्यूच्या बाळभुकेला क्षीरनिधी निर्मिलें ।

त्यांतही कां विष तूं ठेविलें ?॥
ज्या हेतूनें अखिल विश्व हें देवा सांभाळिलें ।
त्यांतही कां विष तूं ठेविलें ?॥

## वेणु-वादन !

मौज माजली जगतांत । नाहिं कुठें कां एकांत ॥
चंद्र खेळतो तारांशीं । नगशिखरेंही गगनाशीं ॥
नद्या नाचती दरियांत । लतिका तरुवर डुलतात ॥
वीज विलसते मेघांत । शांति खेळते वाऱ्यांत ॥
सर्वहि सृष्टी ।
रजनीं रमती ।
प्रेमसंगती ।
बघुनी हें एके रजनीं । मत्सर दाटे कृष्णमनीं ॥ १ ॥
भुलवुनि मायेची दृष्टी । क्षणीं खोंविला वेणु कटीं ॥
श्यामसुंदराची मूर्ती । फिरली कालिंदीकांठीं ॥
शरच्चंद्रमा शांत करीं । शोभत सुंदर धरेवरी ॥
गुढ्यागोपुरें ।
मणिमय मकरें ।
सौधा शिखरें ।

दिशादिशांना द्युति पसरे । गगन गोकुळाला अपुरें ॥२॥
गवळ्यांतिल हा गोपगडी । राजांचाही राजगडी ॥
अवघा गोकुळचा गवळी । धेनुहि विश्वाच्या पाळी ॥
जरि गवळी गोपाळ गडी । ब्रम्हांडाची त्यांत बुडी ॥
बाळब्रह्मा ।
निर्मुनि तेव्हां ।
नादब्रह्मा ।
सृष्टीवरिही करि ताण । सर्व सृष्टिचा सुलतान ॥ ३ ॥
रक्षिति जरि तें वन माळी । धनी तयाचा वनमाळी ॥
वेणुपिकाचा ध्वनि चाले । गगन रवानें दुमदुमलें ॥
हरिमन गायाला वळलें । सकळ गोकुळाला कळलें ॥
मुखीं बासरी ।
धरी मुरारी ।
नाद नूपुरीं ।
छननंछननं नाच करी । तननंतननं गान करी ॥ ४ ॥
चंद्रतारका बघुनि वरी । कृष्ण एकदां हास्य करी ॥
मुरलि मुरारीनें स्फुरिली । घरीं राधिका बावरली ॥
मुरलि मुरारीनें स्फुरिली । विश्ववृत्तिही थरारली ॥
खुलल्या लतिका ।

हंसल्या कलिका ।

सुटालि राधिका ।

धांव मारिली झणिं राया । तिच्या जिवाची ती दुनिया ॥

जशी नासिका शरिरांत । तशी राधिका गोपींत ॥

तिळपुष्पाची नववल्ली । जिणुनी नासा मिरवीली ॥

वक्षोजाही सरस भल्या । कलिका कुंजाच्या हरिल्या ॥

वाटें जगता ।

हिचा निर्मिता ।

महा विधाता ।

साहित्याच्या जलधीला । मंथुनि चंपू हा रचिला ॥ ६ ॥

मुखाब्ज लक्षोनी विमला । गर्वाहि कमळानें त्यजिला ॥

गल्लद्वंद्वानें साची । शोभा हरिली अरशाची ॥

वदनशुक्तिकांत सांजिरी । दंतमुक्तिकापंक्ति बरी ॥

मोहक राधा ।

करि सुखबाधा ।

बाळ मुकुंदा ।

बघुनि कांतिचा एकवळा । जिरली मानिं विद्युन्माला ॥

दर्शन देतां प्रिय राधा । स्रवूं लागली वेणु सुधा ॥

चंद्रचंद्रिका बघुनि वरी । कृष्णराधिका हास्य करी ॥

क्र. ८०२



संस्कार क्र. ८०२ ५३८

तरुवर लतिका बघुनि वनीं । कृष्णराधिका डुलति मनीं ॥
खुले चांदणी ।
प्रेम--रंगणीं ।
कालिंदीवनिं ।
राधाकृष्णाची जोडी । मंजुळ मुरलीच्या नादीं ॥ ८ ॥
शुद्धबुद्धिच्या पैलतिरीं । नव प्रीतीचा नाच करी ॥
बिन मोलाचा दिला बहाल । मुग्ध मनाचा रंगमहाल ॥
वेणु वाजवी मुकुंद बाल । प्रीतीचा धरि राधा ताल ॥
मृदुमधु नादें ।
नभही कोंदें ।
विभु ऐकों दे ।
तरल मारिल्या ललकारी । झुकल्या गोकुळच्या नारी ॥
हरि हरितां मन शुभ गानीं । सदन सोडिलें सुभगांनीं ॥
टाकुनि कुणि गोधनधारा । धांवति किति जगदाधारा ॥
सांवरिति न अलका कुटिला । कुंकुमही नाहीं निटिला ॥
छोट्या मोठ्या ।
गौर गोमट्या ।
मनिंच्या खोट्या ।
बालकन्हय्याला भुलल्या ॥ भवती भवती त्या जमल्या ॥

टाकूनि उदासीन मनें। करिती त्या दासी नमनें ॥
ऐकुनि नवयुवतिमृगीतें। हृदयिं संचरे स्मर गीतें ॥
भीती नच हरिभक्तीला। वसनहि मग कुठलें कटिला? ॥
फेडुनि लुगड्या।
घेती फुगड्या।
धीट धांगड्या।
प्रीतीचा धांगडधिंगा। धरिति अंग मोडुनि पिंगा ॥११॥
शृंगाराच्या नवरंगा। सागररूपा श्रीरंगा ॥
सोळा सहस्रही गंगा। अखंड गोपींच्या रांगा ॥
भेटुनि नानाविध अंगा। खेळ आणिला भररंगा ॥
नर्तनरंगा।
स्वरसरंगा।
मृदुदिलरंगा।
वेणु फुंकिला विश्वबळें। ब्रह्म तयांतुनि उन्मळलें ॥१२॥
वेणु फुंकिला ब्रह्मबळें। विश्व समाधीमधिं डोलें ॥
वेणु फुंकिला मोहबळें। माया ब्रम्हासह बोले ॥
वेणु फुंकिला आत्मबळें। अंतरिं आत्माराम डुले ॥
वेणु बोलते।
विश्व डोलतें।

ब्रम्हहि खुलतें ।
चित्तचक्षुंना तें दिसतें । मायाब्रह्महि एकवटें ॥ १३ ॥
एकांताच्या प्रीतीची । रीत असे या जगताची ॥
प्रीत लोकिची एकांतीं । कृष्ण करी परि लोकांतीं ॥
अंतिं एकदां ती स्फुरिली । नादसृष्टिही झणिं झरली ॥
जल कालिंदीं ।
मधु अरविंदीं ।
स्वर-निस्यंदीं ।
मंजुळ मुरलीच्या नादीं । आनंदाच्या आनंदीं ॥ १४ ॥

## इशारा !

" जपून जा गडे जपून जा "

[ कालानुरूप घडणारीं नाजुक स्थित्यंतरें लक्षांत आणून बालपणांतून तारुण्यांत शिरणाऱ्या बालिकेस हा इशारा दिला आहे ! ]

हिरवळ बाल्याची सरली ।
घसरण तरुणीची आली ।
प्रफुल्ल प्रेमाची छाती ।
भरली आतां ती प्रीतीं ।

गालावरली ती लाली।
लाजेमाजी कशि विरली ॥
उमजेना मज गूढ मजा। —जपून जा गडे जपून जा ॥
पूर्वी दुडदुड तूं पळसी।
आतां प्रौढ जडा गमसी।
पूर्वी करि फिरके गिरके।
आतां मारिसि कां मुरके?।
पूर्वी बघसी दुहिं नयनीं।
आतां छाव्या डोळ्यानीं।
उमजेना मज गूढ मजा। —जपून जा गडे जपून जा ॥
घेसि पूर्वि तें नांव खडें।
म्हणसि अतां 'इकडे' 'तिकडे'!।
पूर्वी वदसी 'अग आई'।
आतां कां बरं 'अग बाई'?।
काय कुणाला दिला बहाल।
मुग्ध मनाचा रंगमहाल?।
उमजेना मज गूढ मजा।—जपून जा गडे जपून जा ॥

# मनोरमण.

## चुकता सूर !

[ ईश्वरी इच्छेच्या मध्यसुराशीं मीलन होण्यावरच मानवी जीवनाच्या संगीताचा सुरेलपणा अवलंबून असतो. तो एक सूर जरी चुकला तरी जीवनाचें संगीत बेसूर होतें. ]

[ चालः—हें साधें भोळें गीत. ]

तो एकच चुकता सूर मेळवा कुणीं ।
गाइलीं सुरेलहि गीतें; – होतील त्याविणें सुनीं ॥ ध्रु॥
प्रीतिच्या स्वरें मंगला काव्यदेविची ।
गुंफण्यास मंगलसूत्रीं बैसलों छान गळसरी ॥–
परि दुष्टें माझा अवचित नेला कुणीं ।
नेमका नेम साधोनी चमचमता मेरूमणी ॥
तारांची करुनी माळ रात्रिच्या गळां ।
घालण्या समुत्सुक हो; – तों चांदवा कुणीं दडविला ॥
हे सप्तसुरांचे कुसुम-कुंज बहरले ।
परि गुलाब नेला कोणीं; – कांटेच हातीं लागले ॥
हृदयांत साद पडसाद सारखा उठे ।
परि सूर मुखांतुनि येतो; – तों जीभ आडवी पडे ॥

हृत्पुटीं हर्षमय वसे दुधाचा घडा ।
परि चुकल्या नादें अंतीं टाकिला मिठाचा खडा ! ॥
हें असेंच अपुरें गीत राहुं दे इथें ।
संगीत जिण्याचें माझ्या बेरसू होइ वाटतें ! ॥

## स्वातंत्र्य-युद्धाचा चौघडा !

[ चालः—दोघि सवति भांडती. ]

तडकावुनि देई राष्ट्रनौबदी वीरा ।
ही धडक ऐकतां होउं जीव बहिरा ॥ ध्रु ॥
छातिचे उभारूं आम्ही वज्रमय कोट ।
या नगारध्वनिची त्यांत बांधुं मोट ।
हृदयांत सळाळति वीरश्रीचे लोट ।
उपसून तयांना करुनि देऊं वाट ।
या वीर हृदयिंच्या अफाट चौबरुजांत ।
आम्हि उत्साहाचे अमित बांधु पाट ।
तूं नौबदिं टिपरी हाणीं रे ।
त्याविणें स्फूर्तिच्या कवनीं रे ।
लय जिवास लागत नाहीं रे ।

चल उडाव टिपरी दणकूं देत नगारा ।
ती धडक ऐकतां होउं जीव बहिरा ॥ १ ॥
ही राष्ट्रगर्जना प्रचंड जइं गरजेल ।
ही पायतळींची भूमि हादरेल।
हा अवकाशाचा थर वरती सरकेल ।
कीं उडून ठिकऱ्या छिन्नभिन्न होईल ।
मग अस्मानाची सोलुनि निळसर साल ।
लाजऱ्या प्रभेला,–बिजलीला ओढील ।
बिजलीची स्फुरती ज्योती रे ।
गरजतां नाद तो चेती रे ।
ही आपुली खोलुनि छाती रे ।
चालवा रणावरि वाद्यांचा फुंकारा ।
ती धडक ऐकतां होउं जीव बहिरा ॥ २ ॥
स्वातंत्र्यरणावरि प्रचंडरव रणबाजे ।
एकदां तडाडुनि समरघोषणा गाजे ।
त्यासरशीं चेतुनि वीरहि अभिनव तेजें ।
सळसळत्या रक्तें छबीस लाली साजे ।
मग समरसुंदरिस पाणी चढवुनि ताजें ।
तुम्हि बघाल वीरां न्याहाळितां चोजें ।

उठतील मृतांचे मुडदे रे ।
या एकच नौबद- नादें रे ।
काळाचे फाडुनि पडदे रे ।
तरि रणवाद्यांवरि पडुं दे टिपर भरारा ।
ती धडक ऐकतां होउं जीव बाहिरा ॥ ३ ॥
कां तुला सांगतों काकुळतीचे शब्द ।
—कीं अखंड उडवी रणवाद्यांचे साद ? ।
जशि हरिणी घेते संगीताचा छंद ।
त्या छंदावरती भान होइ बेबंद ।
त्यापरी उसळुं दे समरांगणींचे नाद ।
नादावरि असते वीरश्रीही लुब्ध ।
कां तियेस दुखवा म्हणुनी रे ।
रिझवूंच करुनि मनधरणी रे ।
ती रणांगणींची राणी रे ।
तिजसाठीं बडवा नगारखाना सारा ।
ती धडक ऐकतां होउं जीव बहिरा ॥ ४ ॥
तो नाद ऐकतां वीरहृदय उधवेल ।
वर चढतें रक्तहि आंतुनि धडकावेल ।
भेदरल्या रिपुचा कलकन् उर उकलेल ।

भ्याडांचा केवळ हवेंत केर फिरेल ।
मग वसंतामधें ओसरतात वहाळ ।
त्यापरी दुस्मनी सैन्यहि तें आटेल ।
हीं रणबाजांची करणी रे
घे तुझ्या मनीं पटवोनी रे ।
चल उडाव टिपरी हाणीं रे ।
तों स्वातंत्र्याचा पुकारील असकारा ।
यासाठिं झडूं दे राष्ट्रनौबदी वीरा ! ॥ ५ ॥

---

## चोरटी मजा !

भिंग किलकिलें करुनि सहज मीं वरच्या मजल्यांतुनी ।
दिली ही नजर स्वैर सोडुनी ।
उदास विषयावरीच इतुका वेळ जिला बांधली ।
टाकिली करुनि तिला मोकळी ।
सूट लाभतां तशीच उठली, तत्पर सरसावली, ।
निघाली सहल कराया भली ! ।
पायाखालीं प्रदेश घालुनि शक्य असे तोंवरी ।
जवळच्या आली सज्जावरी ।

बिचारी भाग्यवंत ती खरी ।
बसावी, तिथेंच कां नातरी ? ।
खाइल त्याच्या मुखीं घालण्या साखर प्रभुही उभा ।
पाहिजे धड दैवाची मुभा ! ॥ १ ॥
मनांत नव्हतें,--स्वप्नीं मग तें नसेंच परि तेधवां ।
चमकला पदर तिथें पारवा ।
त्या पदराच्या पडद्यामधुनी नजर शिरे जोंवरी ।
अहा ! ही मजाच तंव भोंतरीं ।
अस्फुट यौवनबहर अजुनिही होता जरि उमलता ।
तरीही फुलार कुणि तनुलता ।--
सकळाच्या जणुं हिमवंतीनें टाकियली झांकुनि ।
तशी ती गमली अवगुंठनीं ।
जनानी यवनी वरवर्णिनी ।
राहिली निर्भयपणिं येउनी ।
नजर चोरटी तिथें रोंखती फिरताहे भोंवतीं ।
बिचारिस असें काय माहिती ? ॥ २ ॥
हळूं सरकली मुखा खालतीं लाजेची ओढणी ।
झळकली सौंदर्याची खनी ।
सुंदरतेचा सुबक करंडक करून उघडा कुणीं ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3784
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

ठेविला मज पुढतीं आणुनी ।
उदर भेदुनी, गगनामधुनी प्रेमभरानें कुणीं ।
दिली जणुं काढुनि सौदामिनी ।
अथवा शोधुनि हृदय, मांडुनी मनकवड्यानें कुणीं ।
ठेविली हृदयांतिल चांदणी ।
तशी ती ललना कुणिं यावनीं ।
किती निरखिलें परी न पुरलें कोड तिला पाहुनी ।
नजर ही ढळेच ना तेथुनी ॥ ३ ॥
उन्मादानें पिसाट बनुनी धरिलि दिठी[1] रोखुनी ।
गेलें भानहि मज सांडुनी ।
पुरुषाच्या छायेची देखिल दखल नसतें मुळीं ।
तियेची नजर जगाला खुली ।
परंतु इजला पुरुषाकडची जादु असे माहिती ;
बावरी नजर तिची साक्ष ती ।
अवचित उठला समीरणाचा झोत कसा नाकळे ।
शिवला टचकन् तिजला बळें ।
वळली नजर चोरट्यावरी ।
जाहली मुग्धा तंव घाबरी ।
ओढुनि गुंठन उठुनी झटकन् चुकवाया धांवली ।

1 दृष्टी

पुरुषी नजरेची साउली ॥ ४ ॥
करिंची मैना प्राणमोहना भुर्रकन् निसटुनि जशी ।
पळावी भरारुनी अंबरी ।
दंवबिंदूंची मौक्तिकमाला रविकिरणां पाहुनी ।
अशी कीं विरून जाते मनीं ।
अथवा पाहुनि चंद्र उगवता लाजाळूनें जशी ।
मिटावी कोमलशी पालवी ।
पाहुनि मजला चटकन् बाला (!) ओशाळुनि अंतरीं ।
पळाली सज्जांतुनि भींतरीं ।
मींच ती घालविली सुंदरी ।
टोंचते जाणिव ही अंतरीं ।
मनीं विरमलों, जरा शरमलों परंतु रमलों तरी ।
मजेची चोरी झाली खरी ! ॥ ५ ॥

# दसरा !

[ सोनें घेऊन येणारांस स्वातंत्र्ययुद्धाच्या शाहिरानें
पुढील पृच्छा केली. ]

वीररसाचीं ज्यांचीं कवनें
यशोगीत ज्यानें ऐकविणें
तया शाहिरा असलीं पानें
हातीं देतां, सोनें म्हणतां, भुलावणी ही काय ?
तुह्मां नवी कीं दृष्टी फुटली
उदक सांपडे जिला मृगजळीं ।
पानें अवघीं सोनें केलीं ।
असें नसे तर कसा वसवतां खोट्याचा बाजार ?
'हें घ्या सोनें' 'हें घ्या सोनें'।
मुठींत भरतां नुसतीं पानें ।
गार करितसां कांचननामें ।
मूठ उघडितां लागें हातां सुकलें सुकलें पान ! ॥
सोन्यामधलें नांव घेउनी ।
नांवापुरतें साम्य जमवुनी ।

घटकाभर तें सोनें ह्मणुनी ।
लुटावयाचा काळ यायचा बोला हेतू काय ? ॥
हिंदभूमिचें लुटुनी सोनें ।
पुसलीं कोणीं मुखास पानें ।
आह्मीं नाचतों ' हें घ्या सोनें ' ।
फोल घेउनी पानें, आमचें मिळेल सोनें काय ? ॥
पान घेउनी अंतरिं निरखा ।
परदास्याच्या या तों रेखा ।
काय हंसावें ललाट–लेखा ? ।
सोनें म्हणतां दारिद्र्यानें गळा गुंतविला छान !
सोन्याचे ते दिवस संपले ।
घरचे सोनें अम्हीं दवडिलें ।
आंवल्यांनिं तें खुशाल लुटलें ।
लुटालुटीच्या भरांत हातीं पडलीं पानें छान ।
पुत्र पित्यानें, पिता सुतानें ।
संतोषविला आनंदानें ।
आनंदाला पुरलीं पानें ।
पानोपानीं सोनें ह्मणुनी जीव भागला छान ! ॥
झाडावरचें देउनि सोनें ।

काय वंचितां बापुडवाणें ? ।
रुकांपासरी असलें सोनें; । —
स्वातंत्र्याच्या मंगलसूत्रा पडेल कामीं काय ? ॥
पहा शिरावर अपुल्या वीरा ।
कुण्या रानचा कोंवळा तुरा ।
खोंवुनि सजविशि तूं शिर चतुरा ? ।
पुरेच फसलां आज आणुनी उसनवार अवसान ॥
मोर ठुमकतो जसा जातिचा ।
त्या तालावर तुह्मीं नाचा ।
फुका भार कां शिरपेचाचा ? ।
नटवेबाजी करुनि शिवाजी नहो हिंद-संतान ॥
झुगार भारा तो गवताचा ।
चुरुनि टाक तो तुरा तृणाचा ।
नेम कर खऱ्या शिरपेंचाचा ।
विजय--तुऱ्यानें मग तोऱ्यानें साजव जा दसरा ! ॥
करुनि जिवाचें अपुल्या सोनें ।
लुटवा जगतीं यशोरुपानें ।
राष्ट्रमाय मग संतोषानें ।
विजयीं-दसरा करिल साजरा ! ती सोन्याची लूट ! ॥

पुरे करा तर उसनीं सोंगें ।
मर्दुमकीच्या चढत्या रंगें ।
मृत्युलोकची सीमा लंघे ।
अशा दिलानें करा साजरा दसरा! तो दसरा! ॥

# श्री. यशवंत नरसिंह केळकर

## केशभूषा

[ चालः—भूपती खरें तें ]

उमटुनी उषा कासार प्रफुल्लित झालें ।
त्वद्बिंबें दर्पण दर्शनीय हें झालें ॥
मोकळा नितळ हा केशभार विस्काळित ।
तरुछायेसम हा मुकुरीं[1] निस्वन चालित ॥
नीलाभ जळांतुन चंचळ चळती मीन ।
बिलवरी दर्पणांतुनी तरळती नयन ॥
क्षण मधेंच होउनि दंग थांबसी ।
एकाग्र देउनी दृष्टी पाहसी ।
निमिषांत परी अपरीं त्या थरकसी ।

१ मुकुर=आरसा

स्वैर तें सराइत कंकत[२] सर्पे हातीं ।
कांकणेंच नुसतीं नादावुनिया जाती ॥ १ ॥
गर्दशा पहाडांतुनी शुभ्रसा स्रोत ।
घालतो उडी; तइं मानेची तव मात ॥
हेलावत हलका वात वाहन ।
दीपकळी[3] कलते खालीं मोहन ।
पालवीस झटतां जैसें तें सुम ।
कचकलाप हळव्या हातें कवळुनि धरितां-- ।
विंचरिता, वळली मान मुलायम आतां ॥ २ ॥
विंचरीत वीची जळवंतीजळ[४] जाते ।
तइं बहल केशपिंजरींत कंकत रुळते ॥
कचकलाप–कोमल--तारा जुळवुनी ।
टाकिली मान त्या वरतीं गुंगुनी ।
सरकते सलील वरोनी ही फणी ।
लेखनी.[५] ' ललत 'रागाच्या लोटी लाटा ।
विरघळुनी गेला जीव त्यांत चौवाटां ॥ ३ ॥

---

२ कंकत=फणी ३ दीपकळी=ज्योत ४ जळवंती=नदी
५ लेखनी=गज

## काढिशी करुणपूर्णशा वचा !

[ उदास मनाला पक्षांचेहि बोल उद्विग्नताच आणतात ]

दिवस उलगला नाहीं पुरता तोंच काढिशी कशा ।
अशा या करुणपूर्णशा वचा ? ॥
रात्रीचे संतापव्याप रे ! निवले ना अजुनि ते ।
तळमळे अंतर नच हो रितें ॥
क्षितिजांतुन झुळका सकाळच्या शीतळ ।
वाहून आणितिल भुरुभुरु नव परिमळ ।
दग्ध या हृदीं घालतील कीं फुंकर ।
उदास आशा उगाच हृदयीं, खिन्नच ही तर उषा ।
काढिशी करुणपूर्णशा वचा ॥ १ ॥
गोरेमोरें दिसते अगदीं दीन जगाचें मुख ।
झाहले वारेंही विन्मुख ॥
अलक वारुनी मुळिं नच वरतीं वृक्षलता पाहती ।
उदासी कुढति स्वतःशीं किती ॥
फुलें सुगंधी अपुल्या गंधीं गुदमरली भासती ।
अडकले द्विज ते क्षितिजांत कीं ? ॥
अस्मान बिलोरी आयत हा आरसा ।

फांसला चुना अभ्राचा त्यावर जसा ।
बिंबेल कशी मग उषा त्यांत राजसा ।
मळभ मनाला अधिकच करिते खिन्न, कशा मग अशा ।
कांढिशी करुणपूर्णशा वचा. ॥ २ ॥

---

## परी न आला गवळी अजुनी !

अभर होउनी पय प्राशुनी
क्षितिजाच्या या गोठ्याआंतुनि ।
पूर्णबिंब हें मधुर गोजिरें
पुष्ट वासरूं ये सामोरे ।
छिन्न चांदणें--फेस मुखींचा ठायीं ठायीं हा गळलेला ॥
सायंतन या समीरलहरी ।
लतामंडपांतुनी शिरोनी ।
पुष्ट कळ्यांनां तोंडें लावुनि ।
पितां पितां हुंदके देउनी ।
पय प्राशितां फेस मुखांतुन शुभ्रफुलांचा गेला गळुनी ॥

उद्दंड वागडणारीं बाळें ।
दिवसकरानें[1] मिटतां डोळे ।
मातांची त्यां जवळिक लाभे ।
दूर कराया त्या नच दावें ।
स्तन्य पितांना झापड पडुनी झोंपेंमध्यें गेली विरुनी ॥
परी न आला गवळी अजुनी ।
भुकेजलेलें तान्हें, म्हणुनी ।
दृष्ट लावुनी दरवाजांतुनि ।
तरंगलें हें केव्हांपासुनि ।
मधेंच व्याकुळ होउन अगदीं करुण कुठावा करिते निसुनी ॥
चार हतांवर माय वेगळी ।
काय बापुडी असुनी जवळी ।
ओढ घेउनी मान मोडुनि ।
वरचेवर त्या पाही निरखुनि ।
अगतिक झाली स्वताच म्हणुनी पुसट उमासे देते तेथुनि ॥

---

1 दिवसकर=सूर्य

## ' महारदऱ्या 'वरलि सायंकाळ !

केव्हां पाण्यावरुनि तरतां पांढरीस्वच्छ छाया ।
वाटे गोषा निरसुनि वरी येत देवी फिराया ।
वायूसंगें सितपदर कीं दूर पाहे सराया ।
लाटा मोठ्या रुळत कुरळ्या केशपाशापरी या ॥
छोटे पक्षी विखरुनि यदा पांढऱ्याशा परांना ।
ठायीं ठायीं सलिललहरी चुंबुनी पांगतांना ।
चंचूंनीं त्या सलिलवसना पाहती ओढण्याला ।
वीचींच्या या मृदुल पडती तैं चुण्या पालवाला ॥

# लंबोदर विनायक काशीकर

## ‘ देवतेस ’

[ वृत्तः—मुद्रिका]

ही तुझीच आशा मला वेड लाविते ।
किति अन्त पाहसी माझा । कोपलीस कां देवते ? ॥
तिन्हिसांज वाट पाहिली न करुणा तुला ।
अंगार जिवाचा झाला । सोसवें न आतां मला ॥
विश्वास दाऊनी जिवा फसविणें जरी ।
कां तुवां स्वतः हृदयाची । जाणीव जिवाला दिली ? ॥
धनहीन दीन मी परिचित नव्हतों तुला ।
त्या स्निग्ध नजरबंदीनें । कां करिसी मज आपुला ?।
लपविली गुलाली मुखीं तुझ्या रंगली ।
हळुंहळूं तुझ्या प्रेमाची । चाहूल मला लागली ।
भेटण्या मला तूं सखे संगमोत्सुका ।
वर्षिसी सुधेच्या धारा । भूतली जशी चांद्रिका ॥
अनिवार ओढ कोणास ? कुणाला पिसें ? ।

हें गोड जिवाचें कोडें । एकट्या सुटावें कसें ? ॥
घडिभरी बोललों कधीं न कळलें कुणा ।
कां अतां मला फिरविसी । एकान्त स्थलिं वणवणा ? ॥
जो ध्वनी प्रणयचिंतनीं लया लागला ।
तो सूर गोड गाण्याचा । बेताल कसा जाहला ? ॥
काढुनी मनोमय हृदीं चित्र मंगलें ! ।
कां स्वतःच आतां ऐसें । त्वां चितःाडिलें प्रेमले ? ॥
जन ह्मणती मजला गुंग प्रेम–गायनीं ।
निरुपाय हाय ! मज ओढी । ही तुझी नवी ओढणी ! ॥
सौंदर्य–पान लाडके । चटक ना मला ।
देवते ! शुद्धसंगाचा । हव्यास मला एकला ॥
चल गडे मंदिरीं तुझ्या मला दे मुभा ।
द्वारिं हा दास प्राणांची । वैजयंति घेऊनि उभा ! ॥
दे त्वरें प्रेमवरदान भुकेल्या जिवा ।
त्या तुझ्या वदन–चंद्राचा । सहवास जिवाला हवा ॥

## तळमळ !

जयवंत वीर आम्ही । यशवंत जन्मभूमी ॥

स्वातंत्र्य ना म्हणोनी । झालों असें निकामी ॥ध्रु०॥

पावित्र्य पूर्वजांचें । सामर्थ्य सद्गुरूचें,
हिन्दुत्व हिन्दभूचें । गेलें लया मिळोनी ॥ १ ॥

पुण्याइची कमाई । कां ती अखंड राही ?
त्या पूर्व वैभवाची । थाळी दिसे रिकामी ॥ २ ॥

देहीं न त्राण कांहीं । चैतन्य लेश नाहीं–
जिव्हेंतली बढाई । मारी हका जनानी ॥ ३ ॥

कोणी न बोलणारा । व्यसनीं जिवास थारा,
'आराम त्यांत सारा' । ही आमुची जबानी ! ॥ ४ ॥

कर्तव्यशून्य वाता । बोलांतुनी वहातां–
लज्जा शिवे न चित्ता । रक्तांत बेइमानी ॥ ५ ॥

शौर्यासनें धुळीला । तो स्वाभिमान गेला !
ना खंत त्या जिवाला । वाटे कुणा अजूनी ॥ ६ ॥

मागें लपावयाला । मी कोण सांगण्याला ?
स्वातंत्र्य पूर्वजांचें । हें मांडिती दुकानीं ॥ ७ ॥

येईल कां पुन्हां तें । ऐश्वर्य हिंदभूतें ?
ती जागृती जनातें । देईल कां भवानी ? ॥ ८ ॥

# गोड आशा !

हातीं ठेवुनि गाल कोमल अशी ही कोण देवी उभी ? ।
कोठें लावियली हिनें मधुरशी ही स्निग्ध दृष्टी अशी ? ॥
द्वारें ज्या हृदयीं विचार–लहरी नेत्रांतुनी सांडती ।
निश्वासांतुनि गंध हा पसरतो चोहीकडे सारखा ॥
ध्यानीं मग्न मुखारविंद फुललें थोडी दिसे म्लानता ।
जाळी नित्य अशा वयांतिल तिला ती गोड चिन्ता सदा ॥
गेले खोल कपोल हास्य मग ही सोडी स्वयें त्या स्थला ।
अश्रू संतत वाहुनी नयन ही ते शुष्क झाले तिचे ॥
बाले ! मुग्ध कशास ठेविसि असा त्वत्प्रीतिचा भाव तो ।
चिंता ही तुझिया मनांतिल सखे अन्यां कळावी कशी ? ॥
प्रेमाचें मधुगीत मंजुळरवें विश्रब्ध या एकदां ।
स्वर्गांतूनहि धांव घेइल जगीं त्वत्प्रीतिचें जीवन ॥
जें ओष्ठी तव सारखें तरळतें, तन्नाम घेशील कां ? ॥
ऐकोनी गुज तें मनांतिल तुझ्या आतृप्त होईन कां ? ॥

## विधवेचें निद्रागीत.

झांकि नयन कमल–वदन ! लाडक्या त्वरें ।
मी न तुझी माय सख्या ! बघसि कायरे ? ॥ धृ ॥
उदय तुझा बाळ जगीं आज जाहला
सौख्याची ठेव तूंचि वाटसी मला
परि होतिल निष्ठुर जन सर्वदा तुला
जा, तर, जा,–नीज आतां एकदां बरें ! ॥ १ ॥
कलरव हा ऐकुनि तव हृदय कांपतें,
देखुनि तव मधुर वदन हृदय दाटतें,
लपवावा प्रेमलाल ! हृदयिं वाटतें–
असहाय तुझी माय जाहली बरें ! ॥ २ ॥
मम उदरीं जन्म तुझा दोष हा नसे
परि सखया! सर्व लोक मानिती तसें
देतिल ते ताप तुला हें मला दिसे
संग नको म्हणुनि नीज विनवितें बरें ! ॥ ३ ॥
ज्या समयीं सर्व लोक मानिती तुला
घेऊनि मम उदरिं जन्म येइ भूतला
प्रेमाची साक्ष पहा पटवितें तुला
तोंवरि तूं नीज, नीज–जीव घाबरे ! ॥ ४ ॥

करुण वचें वदुनि बोल होइ विव्हला
कवटाळुनि हृदयिं धरी हृदयिंच्या फुला
ठेवुनि निज हस्त कंठिं बाळ निजविला
कालझोंपमग्न बाळ जाहला त्वरें ! ॥५॥
विधवेनें बाळ नसे आज मारिलें
वचन-भंगि पुरुष आजि दूर बैसले
विधवेचे दीन बोल क्रूर कां ठरे-
झांकि नयन कमलवदन लाडक्या त्वरे ॥६॥

# श्रीमती कृष्णाबाई वैशंपायन.

## संशयरत्नमाला.

[ चंद्रोदयास उशीर झालेला पाहून चंद्र-विकासी कमलिनीनें घेतलेला संशय. ]

यात्रें दर्शन दासीला । नाहीं धीर मनीं उरला
जी पूर्वा संध्या समयीं । स्वागत करण्याला येई

उदयगिरीवर रवि बघुनी । लाजे प्रेमानें स्वमनीं
गुलाल उधळी मोदानें । उषेसहित रंगे त्यानें
ऐसें बघुनी,
उदास होउनी,
पूर्वा सदनीं
परतुनि जाणें नको निशीं । शपथ घेतली काय अशी ? ॥
प्रभाकरानें जिंकियलें । शल्य मनीं का तें रुतलें ?
जिंकुनी केले काय परी ? । गेला काळाच्या उदरीं !
गाया स्वागत-गीतासी । जे द्विज आनंदें जाती
निधन--गीतही,
गावें त्याहीं,
या सम नाहीं
दुःख; जगीं हा न्याय असें । प्रिया ! विसरतां यासि कसें ॥
कमलिनि रुसली पाहून । येण्यासी कां अनमान ?
खरा अर्थ त्या रुसण्याचा । माझ्या मनिं कळला साचा
पर--पुरुषाचा सहवास । स्त्री हृदयासी करि जाच
रविसी वरुनी,
सुखें कमलिनी,
नांदे भुवनीं

कुरवाळी अलि--बाळासी । शक्त न बघण्यासी त्यासी ॥
प्रेम–रसाच्या सरोवरीं । उठती शंकेच्या लहरी
त्या लहरी रंगें खुलती । नर--हृदयासी रंगविती
त्या रंग-पटा पाहून । रहस्य समजें मज पूर्ण
सुंदर तरुणी,
प्रेमें वरुनी,
विलास रमणी--
विलास--भुवनीं घेऊन, । रंगीं दंग असा पूर्ण ॥
परि ज्या हृदयीं प्रीति असें। भीती कैशी तुम्हा दिसे ?
दिलें प्रेम परतुनि घ्यावें। नच हें स्त्री--हृदया ठावें
मधुकर–वृत्ती नराप्रती । ईशें दिधली या जगतीं
सौंदर्यानीं,
मोहित होऊनि,
मधु--शब्दानीं
अज्ञ हृदय जें भुलवीतां । मधु घेऊनि चरणें चुरिता ॥
अलि--बाळा मी कुरवाळीं । ह्मणुनी शंका कां आली ?
मीलन प्रेमी हृदयाचें । बाल मधुर फळ हें साचें
विरहानल शमवायासी । आलिंगी हृदया साची
पहिली प्रीती,

जी मनिं होती,
गेली अंतीं
बालरूप नटते तीच । साक्ष देतसे जगतास ॥
स्वागत करण्या नाथाचें । तारक-गण गगनीं नाचे
तमें ग्रासिली भूबाला । धाता रक्षाया तिजला
नरदेहीं सामर्थ्य वसें । अबला-संकट नाशितसें
मोर चकोरा,
द्याया या, या,
कवि सुखावया,
नभीं रास मांडा रंगें । तारक-गण घेऊनि संगें ॥
थोर कुळीं मम जन्म नसे । ह्मणुनी त्यजितां कां ऐसें ?
रत्नें देतिल साक्ष अशी । कीर्ति कुलावर नाहींशीं
कोकिल जन्मे काक-कुळीं । कवि रसिकां मोहिनि घाली
महिवरि येऊनि,
सुधाकरांनीं,
आलिंगोनी,
जिववा ! दासी चरणाची । पुरवा आस प्रिया ! मनिंची

## शेतकऱ्याचें गाणें

( मोटेवर बसलेला शेतकरी तोंडानें रीऽऽरीऽऽऽरीऽऽऽ याप्रमाणें सारखें गाणें म्हणतो याचा अर्थ काय असतो ? )

शेतावरचा शेतकरी । मोटेसंगें गान करी
श्रमासि जातो विसरून । गानीं गुंग असे पूर्ण
जादू काय तुझ्या गानीं ? । मोहुनि रसिकांसी आणि
सुंदर काव्यासी गासी । त्या नादानें कां डुलसी ?
गाई गाणें,
आनंदानें,
त्या नादानें
कर्तव्यासी करी सुखें । री, री, री, री, गाच मुखें ॥१॥
जरी विचारी मज कोणी । अर्थ असे कां ह्या गानीं ?
अर्थ नसे कांहीं त्यासी । परी सुखवितें हृदयासीं
गाणें भाषा हृदयाची । हृदयासाचि कळते साची
म्हणुनी पाहीं,
हृदयीं जाई,
शोधुनि घेई

या हृदयाच्या बोलाशीं । साक्ष असे हृदयापाशीं ॥२॥
भाषा नाहीं वृषभासी । जरि ते कथिती अर्थासी
शेतें डुलतीं मोदानें । त्या गाण्याच्या नादानें
पाणी खेळे शेतांत । शब्द करी तें तालांत
वायू येई,
मोहुनि जाई,
गुंतुनि राही
शीळ घालितो मोदानें । परि तो अर्थासी नेणें ॥३॥
जो, जो, जो, जो, शब्दानें । माता निजवी प्रेमानें
काय अर्थ त्या शब्दांत ? । कां बाळा भुलवीतांत ?
असें एक उत्तर यासी । स्मरणीं आणि बाल्यासी
माता येई,
झोके देई,
गाणें गाई,
झोंप लागते बाळाला । हाच अर्थ समजे त्याला ॥४॥
हृदयीं जीवन प्रेमाचें । तुषार उधळी गाण्याचे
नसे गान कोणासाठीं ! । गान असे हृदयासाठीं !
गातो कवि कोणासाठीं ? । गातो आनंदासाठीं !

गातो डुलतो,
मना रमवितो,
जगा विसरतो
जें भरलें नैराश्यानीं । जातो गाण्यासह गगनीं ॥५॥

---

# विश्वनाथ केशव महाबळेश्वरकर

## माझीं काव्य-सुमें !

झोपें सौध-तलीं, सुधाकर सुधा-वृष्टी करी भूतलीं ।
झालों जागृत मी, निशा परतली, प्राची दिशा रंगली ॥
लेवोनी हिम--शुभ्र धूत वसना वेणीफणी होउनी ।
बाला मंद--पदा अधोमुख लता- कुंजांत आली कुणी ॥
उद्यानीं फुललीं सुगंधित सुमें, वायूसवें डोलत-- ।
होते वृक्ष अनेक, पुष्पित लता आलिंगिती ज्यांप्रत ॥
बालेनें स्वकरें लता हलविली, खालीं सुमें सांडिलीं ।
कांहीं अंजलि अंचलीं--भरुनिया ओच्यामधें वेचिलीं ॥
ती आलापित गीत मंजुलरवें कुंजांतरीं बैसली ।

माला गुंफुनिया गुणीं मग झणीं वेणीवरी घातली ॥
ऐसें हें रमणीय दृश्य दिसतां हृद्--वेलि हेलावते ।
कांहीं हीं सुमनें फुलोनि जगतीं वाऱ्यावरी फेकिते ॥

* * *

"माझीं काव्यसुमें धरील शिरिं कां, गुंफोनि कोणी गुणीं ? ।
किंवा देतिल काय मोद रसिका ?" हें दृश्य आणी मनीं ॥

---

## स्फुंदत असलेल्या बालेस—

---

अश्रूंनीं भिजला तुझा मुख—शशी कां सांग गे भामिनी ।
कां ह्या ओघळसीं अनर्घ्य असल्या मुक्ता स्वनेत्रांतुनी ॥
प्रेमाचा मृदुसा तुझा मज गमे. रज्जू तुटे रेशमी ।
मोत्यांचा सर हा ह्मणोनि गळतो आतां निराशा-तमीं ॥
आंठ्या ह्या पडल्या ललाट-पटलीं कां ? सांग, तूं सुंदरी ।
ह्या हृत्सागरिंच्या जणूं उमळती लाटा ललाटावरी ॥
वाटें कीं बिघडे घडीच सखये ! त्वन्मानसाची जरी ।
त्याच्या ह्या पडल्या, दिसे, सुरकुत्या भाल--प्रदेशावरी ॥
तें वक्षःस्थल पीन कां तव असें भात्यापरी हालतें ? ।
भाता चेतवितो तुझ्या हृदयिंच्या क्रोधानला मन्मतें ॥

फूत्कारा अहिच्या परी करितसे निःश्वास त्वन्नासिका ।
अग्नी अंतरिचा तुझ्या धुमसतो त्याचाच हा धूम का ॥

*　　*　　*

प्रेमाचें वच गोड बोलुनि तुझ्या कोपानला शांतवीं ।
बाले ! याविण अन्य मार्ग नुमजे, मी तो अडाणी कवि ॥

---

## चिमुकली शांता

पायीं पैंजण वाजती रुमुझुमूं पाठीवरी शेपटा-- ।
केसांचा, बहु कृष्णसा लुडबुडे त्यांच्या कपोलीं बटा ॥
कर्णीं मौक्तिक-डूल डोलति, मधें लोंबें हरिल्लोलक ।
कौमार्यांतिल शुद्ध हास्य विलसें गालीं मनोहारक ॥
विस्तीर्णोन्नत भव्य भालिं कुरळे हे खेळती मूर्धज ।
काळेभोर विशाल स्निग्ध हंसरे आकर्ण नेत्रांबुज ॥
वाटोळें परि दीर्घसें मुख हंसें, चाफेकळी नासिका ।
बालेचा थिजवी तुला चिमुकला रक्तौष्ठ ना रे शुका ॥
काळे कुंतल सैल दाट रुळती तद्वौर मानेवरी ।
ग्रीवाभंग करीत हांक परिसे हो कावरीबावरी ॥

एकांतीं असतां मनीं गुणगुणें ती गीत खेळांतलें ।
बालेच्या वदनीं निरागस किती पावित्र्य दैवी खुलें ॥
एका सांवरि ती करें परकरा, हातें दुज्या कुंतल ।
वायूनें उडती, न ठायिं ठरतीं, गालावरीं चंचल ॥
अर्धोन्मीलित ओष्ठ--संपुटिं दिसे ती कुंद दंतावली ।
बोले ती मधु बोबडे गमतसे कीं शारदा पातली ॥

---

‘ यवतेश्वर ’

बालार्काच्या मृदुल किरणीं रंग राता गुलाबी ।
गेल्या देवी जणुं त्यजुनिया पुष्प शय्या कुसुंबी ॥
पूर्णेंदूच्या हिम- धवलशा रम्य या चंद्रिकेंत ।
आहे कोणी मुनिवर उभा वृद्ध गंभीर शांत ॥ १ ॥
दाटे जेव्हां, गिरिवर ! धुकें झाकितें सर्व काया ।
त्वत्शीर्षीं कीं कुणि उभवितें सेतु स्वर्गीं चढाया ॥
तूळाची वा शशि--सित मृदू राशि कीं कापराची ।
किंवा झाली पखरण, सख्या ! पाखरांच्या परांची ॥

शीर्षी केव्हां तव कलतसे शुभ्रशी चंद्रकोर ।
वाहे केव्हां निजशिरिं झरा जान्हवीचीच धार ॥
सोडोनीया हिमगिरि—प्रिया पार्वतीच्या पित्यातें ।
आला येथें शिव रुसुनिया वाटतें मानसातें ॥३॥

## खडीचा नील शालू.

" शालू हवा नील मला खडीचा " ।
पत्नी वदे; बोलत नाथ तीचा-- ॥
" इंदू--मुखाला खुलवावयाला ।
तूं वांच्छिसीं कां, सखये ! नभाला ? " ॥१॥

## जन्मान्तरीं—

जी माझ्या नयनांस नित्य गमली पीयूष वा कौमुदी ।
ती आतां जवळी असोनि बघण्या संकोच वाटे हृदीं ॥
नात्यानें तसल्या तिला न बघणें, आतां कधींही घडो ।
वाचेनें विषयांत नाम वदणें—जिव्हाहि माझी झडो ॥

तारा सर्व तुटोनि वाद्य पडलें, विछिन्न तुंबी--फल ।
तैसें जीवन हाय ! होय जगतीं, आतां गमें निष्फल ॥
माझें संचित येथ होय अपुरें, हा दोष नाहीं तिला ।
ह्या जन्मीं सुकृता करोनि मिळवी जन्मांतरीं हेतुला ।
जिव्हाग्रावरि नाम नाच करितें, वाचे ! अतां--छे--पण ।
ठेवीं तूं दडवूनि खोल हृदयीं पाही न जेथें जन ॥
ती मूर्ती हृदयांत पूजिन अतां मानोनि साऱ्या स्वसा ।
माझा वास जनीं, मनीं विजनता, आहें असा मी पिसा॥

*   *   *

प्रेमाची सरिता रिती, तळमळें मी दीन मीनापरी ।
देवा ! जीवन जन्मि या न मिळणें, देशील जन्मांतरीं ? ॥

---

## सृष्टीचा दसरा !

[चाल:—भला जन्म हा तुला लाधला-]

वर्षर्तूचा काल संपला, सुखद शरत्साजिरा ।
परतला पुन्हां सखा हा घरा ॥ धृ ॥

कृष्ण मेघ ते दूर पळाले सोडुनि नीलांबरा
साहाति न शरद्-भानुच्या करां
विरल धुक्याचें वसन टाकुनी ल्याली हरिदंबरा
यौवनें मुसमुसली ही धरा
कात टाकुनी टवटवली कां वसुंधरा सुंदरा
हर्षवुनि अवघ्या नारीनरां,–
हा पुन्हां तळपतो गगनामधिं भास्कर
कीं सुवर्ण लुटितो अस्तोदयीं दिनकर
हें पुनरपि शोभें तारांकित अंबर
शुभ्र चांदिची शरत्कालची ज्योत्स्ना ही सुखकर
वर्षतो शशांक शीतलकर ॥ १ ॥
पीत केतकी, मखमालीचें झेंडु पुष्पही तसें
केशरी वरति खुलावट दिसे
सुवर्ण चंपक, पीत चिमुकलीं तिलक–पुष्पकें तशीं
सृष्टिचीं सान बालकें जशीं
शेवंती ही पिवळी फुलते राणी गमते भली
डुलतसे कुसुमित विश्वांतली
हे बाळ भानुचे सुवर्णकर पातले
हें फूल पांखरूं पिवळें खेळें, खुलें

हें अस्तोदयिचें सुवर्ण नभ रंगलें
सुवर्ण लुटिते वसुंधरा कां शरत्कालची धरा
करी कां दसरा ही साजरा ?

---

## सवत नव्हे–कन्याच !

जादू ह्या नयनांतली तव गडे ! घाली :मला मोहिनी
लावी पूर्ण समाधि जी स्फुरविते कांहीं असें मन्मनीं॥
काव्याची, सखये ! खरी, गमतसें, तूं स्फूर्तिदायी झरी ।
नाहीं ही कविता तुझी सवत गे ! कन्याच आहे परी ॥१॥

---

# श्री. नारायण वासुदेव अंतुरकर.

## स्वातंत्र्याची चाहूल.

उदयास यावया पूर्वी । तिमिरास दिवाकर हरितो ।
फांकती दिशा दाहीही । म्हणुन काय विध्वंसक तो ? ॥१॥
जलवृष्टि व्हावया पूर्वी । जोराचे वारे सुटती ।

तरु पडति गर्जना होते। म्हणुन काय विध्वंसक ती? ॥२॥
कळिमधुनि फूल फुलतांना। उघडतें पाकळ्या मिटल्या।
बाहेर हंसत मग पडतें। कुणि वदेल ध्वंसक असल्या?॥३॥
खडकांत बद्ध झालेले। निर्झर ते वर येतांना।
फत्तरास उलथुनि येती। कां वदतां ध्वंसक त्यांना? ॥४॥
पारतंत्र शैलाखालीं—। घायाळ होय भू-माय।
तो शैल दुभंगाति वीर,। आवाज तयाचा होय— ॥५॥
अपरिहार्य नैसर्गिक तो। कां वदता ध्वंसन त्यास?।
येणाऱ्या स्वातंत्र्याची—। चाहूल परी ती खास! ॥६॥

---

## पतन!

शाखा 3784

बरसातीचा काल संपला कार्तिक पुनवेची रात्र
शांतकरानें पसरत होता तेज सुधाकर सर्वत्र ॥
विमल जलानें एक चिमुकलें होतें टाकें भरलेलें
दृश्य नाभांतिल हृदयिं तयाच्या अस्फुट बिंबित झालेलें ॥१॥
बाळपणाचा काल संपला तारुण्याची सुरवात
स्वप्नामधली सृष्टी नटली स्वर्ग सांपडे स्वकरांत

फसव्या दुनियेमधला नवखा तरुण मुशाफर कुणी असा
ध्येय उच्चतम हृदिं सांठवुनी लागे क्रमणा पथ सहसा ॥२॥
शरद् संपुनी येत उन्हाळा कडकडून पडलें फार
पिकें करपलीं टाकीं अटलीं दुनियेचा बदले नूर
चांदण्यांतलें चिमणें टाकें जलबिंदुहि नव्हता त्यांत
शेवाळ्यानें हिरवळलेले दिसताती दगड तळांत ॥३॥
प्रत्यक्षाचे कडवे अनुभव नवख्या तरुणाप्रति आले
ध्येय उराशीं नव धरिलेलें अवचित निसटुनिया गेलें
दग्ध जहाल्या आशा अवघ्या राखेनें भरलें हृदय
वाऱ्यावरचें पीस बिचारें गिरक्या घे जीवित हाय ॥४॥
क्रमाक्रमानें वर्षा येऊन झाले पल्वल जलपूर्ण
हृदयामधले अंकुर वठले पालवील कां कधिं कोण ? ॥५॥

# मकरन्द

## जवानी—

जवानी विश्वरूपा ध्या । सुटेना प्रीतिचा ध्यास
गुन्ह्याची होत मम सीमा । जगाया जाहला त्रास
जिवाचें प्रीतिचें तारूं । तुफानीं गरगरा फिरलें
अतां आधार कोणाचा ? । प्रभो ! जग शून्यसें झालें
प्रेम ना आंधळें आहे । म्हणूनी पाय हा चुकला
परंतु या क्षणामधुनी । प्रीतिचा वायदा सरला
जहाली ही दिशाभूल । जिवाचें ध्येय मावळलें
शिडावांचून हें तारूं । तळाला शेवटीं गेलें !
भटकण्या निबिड अंधारीं । लागते ज्योत प्रीतीची
परी हा ! हा ! अतां कैची । कालक्रमणा करायाची ?
चढाई प्रेमगीताची । सारखी स्तब्ध ऐकुंदे
जिवाचा ताल द्यायाला । समाधी शुद्ध लागूंदे !
दिलाच्या दिल्रुब्यावरची । पिळा हो तार प्रीतीची
सुरानें गान रंगेल, । खुशाली हीच जीवाची !

विषारी शुष्क उद्यानीं, । फुलांनीं दरवळें रान–
तयाचा स्वाद घेतांना, । थरारें हृदय बेभान !
मना ! घ्या शेवटीं आतां, । रजा हृदयांत प्रीतीची
चला कर्तव्य नेईल । तिथें रेषा नशिबाची !
नको तें प्रीतिचें वारें । कुसुंब्यांतून आलेलें
बरा हा जीव एकांतीं । सुखाचे नेत्रही मिटले

---

## आनंदी आनंद गडे गेला आतां कोणीकडे !

अहा उमलली वृत्तिलता । बहुत फुरफुरे प्रीतिलता
शरदृतूची बरसात । आकाशीं भुलल्या गात,
नील प्रभ नवतेजांत । अहा चकाके लकाकत,
अंधुक पडल्या हिमांतून । चोरून पाहे ही कोण ?
रम्य चांदणी
हासत मधुनी
क्षणिं मुरकोनी
बहर प्रीतिचा हाच गडे । गेला सांगा कोणीकडे ?
या खुलल्या जोत्स्नेंतून । मंद वायु झुलवी वरुन
कलिका डुलते लाजून । लतिकेच्या अंकीं बसुन

पूर्वदिशेच्या दरींतुन । बघे कोण डोकावून ?
अहा हांसली
क्षणीं लाजली
कळी उमलली ?
प्रीति नजर हीच ना गडे ? गेली सांगा कोणीकडे ?
सताड उघड्या हृदयांत । प्रीतीची लावा वात
पावित्र्याच्या परांतुन । तेल पोचवा भरभरुन
पेटू द्या नवती ज्योत । कवि श्रेष्ठाच्या हृदयांत
निराश जाळा
ऐक्य जिव्हाळा
पूर्ण उमाळा
द्या जगतीं भरूनीच गडे । येइल हा आनंद गडे !

# श्री. प्रभाकर महादेव फणसे

## —तारा तुटलेली पाहून—

[ चालः—भूपती खरें तें ]

ये प्रतिभावाला गगन-सौध उतरोनी ।
घावया कुणाचा कवनहार गुंफोनी ! ॥
वा रजनी विधुच्या विरह-वन्हि कोपानें ।
फेकिते शलाका-बाण नेत्र-चापानें ? ॥ १ ॥
कीं दिली कंठिची झुगारून मणि-माला ।
तींतुनी उडे हा दिव्य-मौक्ति धरणीला ? ॥ २ ॥
मग नाथ सखीचा येउनि क्षितिजा वरती ।
आणितो चुंबुनी प्रेम-सागरा भरती ॥ ३ ॥
तारकामिषें हा प्रेमाश्रू कां गळला ? ।
वा निशाराणिचा दिव्य तन्मणी तुटला ? ॥ ४ ॥
सुरलोकिं सुधेचें कुंभ सदा भरलेले ।
त्यांतुनी झरे हा बिंदु,--मही कां झेले ? ॥ ५ ॥
अंबरीं अप्सरा करिती नर्तन अथवा ।
हरपली कुणाची नुपुर--किंकिणी तेव्हां ! ॥६ ॥

स्वर्गीय वैभवावरी सोडुनी पाणी ।
अवतरे भूवरी कर्मवीर कां कोणी ? ॥ ७ ॥
कीं 'वसुंधरेच्या' तेज--रक्षणासाठीं ।
ती हांक ऐकुनी उडी घेइ जगजेठी ? ॥ ८ ॥
कवि केशव--सुत कां व्योम--सागरीं शिरले ? ।
उडु--रत्न फेंकुनी गरिब घरेला दिधलें ? ॥ ९ ॥
वा सृष्टि--सतीला आलें घरचें लेणें-- ।
मज गमे............ ॥ १० ॥

*　　*　　*

परि थांबा, रसिका ! शिणली आतां कविता ।
कल्पना विरति नव कल्पनेंत बघबघतां ॥ ११ ॥

## कबूतरास—

कबुतरा ! प्रेम पांखरा ! थांब ना जरा,
धन्य तव जीव ।
मज कळुंदे सखया, तुझ्या मनींचा भाव ॥

प्रेम जें विश्वव्यापिजें, स्वर्गि वसविजें
तयाचा भक्त।
तुज मान्य नसेना, दुज्या कुणाचें तख्त ? ॥
बहुमोल, असति तव बोल, खरा चंडोल
प्रीतिच्या गगनीं।
मारिसी भराऱ्या, अर्थ सांग बा कानीं ! ॥
रंगसी, भान विसरसी, सदा नाचसी
प्रणय--दरबारीं।
चहुंकडे उधळिसी, प्रीती–कवनें सारीं ॥
किति कवी, गाति नवनवीं, परी मानवीं
प्रीति--कवनें तीं-- ।
वाटेल तयां तव गान कळें तर खंती ॥
आनंद, हाच तव छंद. प्रणय–मकरंद,
तुला लाभावा।
परि मानव भाळीं, दुःख हाच कां ठेवा ? ॥
कबुतरा! प्रेमपांखरा ! उडुनि जा घरां !
पुरे हा नाच।
लागेल दृष्ट बा ! अंत होइ भलताच ! ॥

# श्री. कमलाबाई देशपांडे.

॥ हांसत कर्म करावें भोगावें, रडत तेंचि परिणामीं ॥

शुक्ल पक्षांतील अष्टमोची रात्र. तीन प्रहर रात्र उलटून गेलेली. सर्व जग निद्रानंदांत पूर्ण गुंगून गेलेलें. अतिशय खेळकर मूल ज्याप्रमाणें दिवसभर दांडगाई करून अगदीं गाढ झोंपीं जातें, व कोणत्याही तऱ्हेनें बाहेरील गडबडीनें त्याची झोंपमोड होत नाहीं, तद्वतच ह्या उपद्व्यापी जगाची स्थिति झालेली होती. 'नीज आतां' ह्मणून आईनें दामटून एकदां काळी वुलई डोक्यावरून घातल्याबरोबर या प्राण्याला इतकी गाढ झोंप लागली कीं बाहेर विश्वांत काय घडामोड झाली त्याचा त्याला पत्ताहि लागला नाहीं. मध्यरात्रीच्या प्रशांत वेळीं, इकडे तिकडे कोणी नाहीं असें पाहून बाहेर येऊन सरोवरावर खेळणाऱ्या हरणाप्रमाणें चंद्रानें पळत पळत येऊन आपला खेळ आकाशांत सुरू केला. लहानसें राज्य स्थापून तारकारूपी परिवाराची योग्य ठिकाणीं नेमणूक करून रोहीणीसमवेत हा चंद्रमा पहा कसा आपल्या सौंदर्याचें व पराक्रमाचें प्रदर्शन करीत वरून हंसत हंसत खालीं बघतो आहे! पण झोंपेंत गढलेल्या मुलाला जगांत कोणी अलंकार घालून मिरविलें ह्मणून त्याला आनंद कसला? तो आपल्या निद्रानंदांतच तल्लीन! हातांत दिवा घेऊन, पाळण्यांत निजलेल्या मुलाच्या तोंडावरील पांघरूण काढून पाहणाऱ्या

आईला त्या मुलाचें जसें ईषत् हंसरें मुख दिसतें त्याप्रमाणेंच चंद्राचा दिवा हातांत घेऊन जगाकडे हळूंच निरखून पाहणाऱ्या सृष्टिसतीला चंद्रप्रकाशांत जगाचें किंचित हंसरें मुख दिसत होतें तेवढेंच! तेवढाच त्यावर विश्वातील घडामोडीचा परिणाम?

× × × ×

पण बऱ्याच गोष्टींची जगाला दाद नसली म्हणून काय झालें? पहा तर खरें एकदां आकाशाकडे! त्या चंद्राचा नुसता डौल तर पहा! स्वतः जवळ विशेष सामर्थ्य नाहीं पण जें काय लोकांकडून मिळेल तेवढेंच घेऊन संतुष्ट मनानें इमानेंइतबारें विश्वाची कामगिरी बजावणाऱ्या ह्या एकनिष्ठ सेवकाची ऐट तर पहा! त्याच्याच मागोमाग डौलानें मिरविणारी ही रोहिणी. घरभर मुलांप्रमाणें आकाशाचें आंगण उणें करणारा हा तारकसमूह; गरीबींतच का होईना पण तशाही स्थितींत दुसऱ्यावर उपकार केल्यामुळें कृतज्ञ बनून ह्या चिमुकल्या राज्याचें स्वयंस्फूर्तीनें रक्षण करणारा, व आपल्या एकामागें एक अशा कोटांनीं चंद्रराज्याला अभेद्य करणारा हा ग्रहसमुदाय; व सर्व गोष्टींची समृद्धि दर्शविणारी ही आकाशगंगा; असल्या राज्यांत उणीव तरी कसली रहाणार.? पहा बरें चोहींकडे कसें समाधान, प्रेम व आनंद यांचें साम्राज्य पसरलें आहे! बरोबरच आहे. संपत्तीची चकाकी नसली म्हणून गरिबींतील प्रेमाचें मार्दव कांहीं कमी सुखकारक नसतें!

× × × ×

अरे! पण हें काय? ह्या आनंदसिंधूला ओहोटी कसली लागली! मघाशीं डौलानें मिरवत असलेला चंद्रमा एकाएकीं फिकट

[stamp]

कां वाटूं लागला ? भविष्यत्कालीं घडून येणाऱ्या एखाद्या भयंकर प्रसंगाचें आधींच भविष्य कळलें असतां दहशत बसून जसा तोंडावर फिकटपणा येतो तसाच हा दिसत आहे. ही परचक्राची तर भीति नव्हे ना ? हें पहा, पूर्वेकडून कसला पांढरा धुरळा उडत आहे तो! हा पहा मधून एक पिवळा तीर आला, झालें ! पूर्वेकडील तारांचा फडशा पडूं लागला. तो तिकडे जाळ कसला? हरहर ! शत्रूनें जाळपोळही करावयास सुरवात केली वाटतें ? आणि हें सर्व उघडे डोळे ठेवून पाहण्याचें चंद्राच्या नशिबीं आलें हं ! पण चंद्रही अंतर्धान पावला ! आणि रोहिणी ? ती तर त्याचे पुढेंच अंतर्धान पावली. शत्रूच्या ताब्यांत सांपडून अपमानकरून घेण्यापक्षां जगांतून नाहींसें होणें खरोखरच चांगलें. चंद्रा तूं गरीब खरा पण बाणेदार आहेस. रजपुतांचा मूळ पुरुष तूं ! सर्व तारकांचा जोहार करून शत्रूच्या हातीं कोणालाही लागूं न देतां शत्रूचा नाश करण्याच्या उद्देशानें अरण्यांत चालत आलास हेंच योग्य !

× × × ×

हीं पहा नवी कारकीर्द ! हा प्रखर प्रकाश तर पहा ! अहो ! पण बघवत नाहीं तेथें पहा काय ? ही भास्करराजांची स्वारी सोनेरी मंदील घालून मोठ्या दिमाखानें दिग्विजय करीत वर येऊं लागली ! सगळीं खडबडून जागीं झालीं. बरोबरच आहे. अशा प्रखरतेपुढें कोणाला झोंप यावयाची आहे ! भास्करराज ! आपण तेजस्वी आहां. पराक्रमी आहां. पण हा उद्दामपणा

कशाला? आपणही किती केलें तरी विश्वाचे नोकरच आहां ना? बिचाऱ्या गरिबाच्या संसाराची धूळधाण कां केलीत? चंद्र तुमच्यापुढें यःकश्चित् तर खराच;तुमचा आश्रित तो! पण आश्रिताचें वाटोळें करण्याची ही कोठली पद्धत? स्वयंप्रकाश असलां ह्मणून दुसऱ्याच्या प्रकाशाचा लोप करावयाचा? तुमचा तो चंद्रच पहा की? त्याच्या राज्यांत तोच सर्वांत तेजस्वी होता ना! पण त्यानें कधीं असा दुष्टावा केला कां? आपल्या सर्व आश्रितांचें संरक्षण करून, त्यांचीही उन्नति करून, त्यांच्या व आपल्या तेजानें कसा सुखानें मिरवत होता. पण आपण पडला स्वयंप्रकाश पराक्रमी! तुह्मांला 'निर्वीरमुर्वीतलं' करण्याची आकांक्षा! आधीं तुह्मी मुलें, बाळें, बायको ह्यांना तरी कुठें जिवंत ठेवलें आहे ह्मणा! ह्मणून तुह्मांला आश्रितांचा सांभाळ करावयाला सांगावयाचें? चंद्राचा परिवार कसा त्याच्या भोंवतां बागडत होता. आपण मुलेंबाळें बायको सर्वांची वाट लावून बसलां. बरोबरच आहे. सगळ्यांची वाट लावून जळत्या अरण्याप्रमाणें दिसणाऱ्या ह्या आकाशावर खुशाल सत्ता चालवा. खरेंच सांगा बरें! तुह्मी सर्व-श्रेष्ठ ह्मणून तुह्मांला काय ऐट वाटत असेल तेवढीच. परंतु ह्या एकलकोंडया वृत्तीनें तुमच्या अंतःकरणाला समाधान मिळतें कां? प्रेमाचा ओलावा येतो कां? तो जर हवा असेल तर इतकें स्वयंमन्य होऊन चालावयाचें नाहीं. दुसऱ्याच्या मताची थोडी तरी पर्वा करावी लागेल; त्या खेरीजच्या नुसत्या पराक्रमानें खरें समाधान नाहीं हो नाहीं होणार! पण जाऊं

या. परिस्थितीच तशी आल्याखेरीज तुह्माला त्या शब्दांचें महत्त्व कळणार नाहीं.

× × × ×

पाहिलेंत, वरवर चढत आलेला रथ कलंडला हो कलंडला! आतां जाणार!. पश्चिम समुद्रांत जाऊन पडणार! कारण मध्यें आधारच नाहीं. मुळीं खांबाचाही आधार न घेतां आकाशांत राज्य स्थापावयाची आपली उमेद, आणि मदतही कोणाची घ्यावयाची नाहीं. तुह्मांला तुमच्या कुटुंबाचें साह्य नाहीं. कारण आपण पहिल्यानेंच त्याची वाट लावून बसलांत. आतां कोण तुमच्या उपयोगी पडणार! अंतरिक्षांत साम्राज्य स्थापावयाची आपली महत्त्वाकांक्षा पुरी होत नाहीं तर! आतां कां बरें तुमचें तोंड फिकट झालें? इतका वेळ आह्मी बोललों त्याची प्रतीति येऊन त्यामुळें तर ही उदासीनता आली नाहीं ना! पहा बरें तुमचा चेहरा कसा लाल झाला आहे तो! पण मघाचें तेज गेलें. तुह्मीं रागावलां आहां पण त्याचा उपयोग स्वतःचा दाह करून घेण्यापलीकडे नाहीं. पहा, तुमचा हा संताप पाहून सगळें जग कसें तुमच्याकडे टक लावून हांसत आहे. हा संताप आहे, कां पश्चाताप आहे, कां लज्जा आहे? हा रक्तिमा तरी कसला! कसला कां असेना! तुमची वही फिरली येवढें खरें. हेंच जर स्वपराक्रमानें अंध न होतां दुसऱ्याची थोडी तरी पर्वा केली असतीत तर एकादा तरी बांधव गत उपकार स्मरून तुमच्या साहाय्याला धांवन

आला असता, पण आतां काय उपयोग ? लोकांचीं अंतकरणें दुखविलींत त्या वेळींच याचा विचार करावयाचा होतात. तिकडे पूर्वेकडे काय पाहतां? तिकडे एकाद दुसरा तारा चमकूं लागला होय ? लागावयाचाच !—तुह्मी सर्वांचा संहार केलात; पण त्यांच्यांत एकी होती; प्रेमाचे लागेबांधे होते; ते चंद्राचे हेर होते. ते पहा हळूं हळूं लहान मोठे तारागण पुढें येऊन गडबड करूं लागले आहेत. ही पूर्व तयारी बरं ! मध्यरात्रीच्या वेळीं फिरून मागच्यासारखें राज्य स्थापन झाल्याचें तुह्मांला दिसेल ! नका, असें पश्चिम-समुद्रांत तोंड दडवूं नका. आतां कां बरें तोंड रडवें केलेंत ? पूर्वसमुद्रांतून वर येतांना आपलें हंसरें दिसणारें तोंड अजून आह्मांला आठवतें आहे. बरोबरच आहे. " हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं " ॥

दा. क. 3784
REFBK-0003145